विमानचालन संचालनालय, मुंबई या कार्यालयातील दोन वैमानिकांना "Munich Germany" येथे उजळणी प्रशिक्षणाकरीता पाठविण्यास मान्यता तसेच प्रशिक्षणावरील खर्चास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : विचासं-११२६/प्र.क्र.६३/विमान-१,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : ०१ एप्रिल, २०२६

वाचा : १) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.विचासं-१११३/प्र.क्र.१३७/२८-अ, दि.०९/०७/२०१३ अन्वये निर्गमित करण्यात आलेले मा.शक्ती प्रदत्त समितीच्या दि.२५/०६/२०१३ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

२) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.विचासं-१११८/प्र.क्र.३५/२८-अ, दि.२३ एप्रिल,२०१८ अन्वये निर्गमित करण्यात आलेले मा.शक्ती प्रदत्त समितीच्या दि.०६/०४/२०१८ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. विचासं-१११८/प्र.क्र.८०/२८-अ, दि.०८/०५/२०१८

४) एअरबस इंडिया प्रा.लि.कंपनीचा दि.१३/०२/२०२६ रोजीचा ई-मेल संदेश.

५) विमानचालन संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.डीए/एडीएम/१६३/२०२६, दि.१३/०२/२०२६

प्रस्तावना :

केंद्र शासनाच्या डी.जी.सी.ए. च्या CAR Section 8 Series H Part II Issue III मधील परिच्छेद ९.३.१ नुसार विमानचालन संचालनालय,मुंबई या कार्यालयातील प्रत्येक वैमानिकांना Level "D" Full Flight Simulator वर उजळणी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. त्यानुसार एअरबस इंडिया प्रा.लि. कंपनीने संदर्भ क्र. ४ येथील दि.१३/०२/२०२६ च्या ई-मेल संदेशाव्दारे Munich Germany येथे वैमानिकांच्या उजळणी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आल्याचे विमानचालन संचालनालय, मुंबई यांना कळविले आहे. सदर ई-मेल संदेशाच्या अनुषंगाने विमानचालन संचालनालय,मुंबई यांनी संदर्भ क्र. ५ येथील पत्रान्वये कॅ.महेंद्र दळवी, वैमानिक (हेलिकॉप्टर) आणि कॅ.मोहित शर्मा, वैमानिक (हेलिकॉप्टर) यांना दि. २१ एप्रिल, २०२६ ते दि.०५ मे, २०२६ या कालावधीत Munich Germany येथे उजळणी प्रशिक्षणासाठी पाठवण्याकरीता आणि त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यानुसार विमानचालन संचालनालय,मुंबई या कार्यालयातील कॅ.महेंद्र दळवी, वैमानिक (हेलिकॉप्टर) व कॅ.मोहित शर्मा, वैमानिक (हेलिकॉप्टर) या दोन वैमानिकांना Munich Germany येथील उजळणी प्रशिक्षणास पाठविण्यास व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

विमानचालन संचालनालय,मुंबई या कार्यालयातील खालील तक्त्यात नमूद दोन वैमानिकांना त्यांच्या नावापुढे नमूद केलेल्या कालावधीमध्ये उजळणी प्रशिक्षणासाठी Munich Germany येथे जाण्यासाठी व त्याअनुषंगाने होणाऱ्या अंदाजित एकूण रु.९६,३०,५९५.२०/- इतक्या प्रशिक्षण खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संबंधित वैमानिकांना प्रशिक्षणास उपस्थित राहण्याकरिता दिनांक २१/०४/२०२६ (म.नं.) रोजी मुख्यालय सोडण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

अ. क्र.	वैमानिकाचे नाव व पदनाम	प्रशिक्षणाचा दिनांक	प्रशिक्षणाचा एकूण कालावधी	प्रशिक्षणाचे ठिकाण
१	कॅ.महेंद्र दळवी, वैमानिक (हेलिकॉप्टर)	दि.२१ एप्रिल, २०२६ (म.नं.) ते दि.०५ मे, २०२६	१५ दिवस	Munich Germany
२	कॅ.मोहित शर्मा, वैमानिक (हेलिकॉप्टर)	दि.२१ एप्रिल,२०२६ (म.नं.) ते दि.०५ मे, २०२६	१५ दिवस	Munich Germany

३. उपरोक्त प्रशिक्षणासाठीच्या खर्चाचे विवरण सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये नमूद करण्यात आले आहे.

४. सदर प्रशिक्षणासाठी एकूण दोन वैमानिकांचा Munich Germany येथील प्रशिक्षण दौऱ्याचा संपूर्ण खर्च व इतर कर असा अंदाजित एकूण रु. ९६,३०,५९५.२०/- इतका खर्च येणार आहे. सदर खर्च संबंधित आर्थिक वर्षाच्या "मागणी क्र.ए-४ "२०७०-इतर प्रशासनिक सेवा ११४, परिवहन साधनांची खरेदी व परिरक्षण (००) (०२) विमान चालन सल्लागार, महाराष्ट्र शासन (अनिवार्य) (२०७० ०१५६)" या लेखाशीर्षांतर्गत "५० इतर खर्च" या उद्दिष्टाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा.

५. बिम्स प्रणालीवर निधी वितरणासाठी सह सचिव/उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (विमानचालन, मंत्रालय, मुंबई (A००३६)) हे नियंत्रक अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत. संचालनालय स्तरावर देयके अदा करण्यासाठी उपसंचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र.२०२६०४०११४५५४२५००७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

APARNA RAJESH CHURI

Digitally signed by APARNA RAJESH CHURI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=f7c51cdde8909e037ec9e7d72236f3e3c46c61072b3926b1521c06f77d1662cb, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1D4D6EA1D0CC1ED1FA0FC3C3FEB482175B2BC0C8BCF42B15DD3EE7D5CC3764F8, cn=APARNA RAJESH CHURI
Date: 2026.04.01 14:56:55 +05'30'

(अ.रा.चुरी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२) संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई - ५६.
३) उप संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई - ५६.
४) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) महालेखापाल, (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८) सामान्य प्रशासन विभाग /कार्या.२५, मंत्रालय, मुंबई - ३२.
९) निवडनस्ती (विमान-१)

शासन निर्णय क्र. विचासं-११२६/प्र.क्र.६३/विमान-१, दिनांक ०१ एप्रिल, २०२६ सोबतचे सहपत्र

परिशिष्ट-१

राज्य शासनाच्या हेलिकॉप्टरवरील वैमानिकांच्या Munich, Germany येथील उजळणी प्रशिक्षणासाठी लागणाऱ्या खर्चाचे विस्तृत विवरणपत्र

अ.क्र.	खर्चाची बाब	वैमानिकांच्या प्रशिक्षणाकरीता येणारा खर्च
१.	मुख्यालय सोडण्याची तारीख	दि.२१ एप्रिल,२०२६ (म.नं.)
२.	प्रशिक्षणाचा कालावधी	१५ दिवस {प्रशिक्षण दि. २१ एप्रिल, २०२६ (म.नं.) ते दि.०५ मे, २०२६}
३.	प्रशिक्षणासाठी येणारा खर्च (Recurrent Ground & Simulator Training)	Euro. € ५९३९६.४८ = रु.६८,३०,५९५.२०/- अंदाजे
४.	दोन वैमानिकांच्या प्रवास खर्च	रु.१३,००,०००/- अथवा प्रत्यक्ष खर्च (जो कमी असेल तो)
५.	निवास, टॅक्सी प्रवास, दैनिक भत्ता, प्रवास विमा, पासपोर्ट, व्हिसा व मोबाईल खर्च व केंद्र शासनाचा कर.	रु.१५,००,०००/- अथवा प्रत्यक्ष खर्च (जो कमी असेल तो)
६.	इतर अनुषांगिक खर्च	प्रत्यक्ष खर्च
७.	अंदाजित एकूण खर्च रुपये	रु.६८,३०,५९५.२० + रु.२८,००,००० = रु.९६,३०,५९५.२०/- अथवा प्रत्यक्ष खर्च (जो कमी असेल तो)

APARNA RAJESH CHURI

Digitally signed by APARNA RAJESH CHURI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=f7c51cdde8909e037ec9e7d72236f3e3c46c61072b3926b1521c06f77d1662cb, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1D4D6EA1D0CC1ED1FA0FC3C3FEB482175B2BC0C8BCF42B15DD3EE7D5CC3764F8, cn=APARNA RAJESH CHURI
Date: 2026.04.01 14:57:25 +05'30'

(अ.रा.चुरी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन